दै. गोदातीर समाचार दि. 06/07/2022

# दुचाकी चोरी करणाऱ्या अल्पवयीन मुलांसह तीन आरोपीतांना अटक

दै. गोदातीर दि. 06/07/2022

## ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त; वजिराबाद पोलिसांची कारवाई

**नांदेड-** शहर व परिसरातील दुचाकी चोरणाऱ्या टोळीला वजिराबाद पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने सोमवार दि. ४ जूलै रोजी अटक केली. त्यांच्याकडून काही दुचाकी जप्त केल्या. याप्रकारचे अजून गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांनी व्यक्त केली.

शहर आणि जिल्ह्यातील गुन्हेगारी मोडुन काढण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक निसार तांबोळी, पोलीस अधीक्षक प्रमोद-कुमार शेवाळे, अतिरिक्त पोलीस अधिक्षक निलेश मोरे, विजय कबाडे व उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) चंद्रसेन देशमुख यांनी पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना सक्त सुचना दिल्या आहेत.



सदर सुचनांचे अनुषंगाने पोलिस निरीक्षक जगदीश भंडरवार यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकचे अधिकारी संजय निलपत्रेवार व अंमलदार यांनी पोलीस ठाणे हद्दीतील गुन्हेगारांना चेक करुन गुन्हेगारांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात येत होते.

दि. चार जूलै रोजी गुन्हे शोध पथकचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निल-पत्रेवार व त्यांचे सहकारी गजानन किडे, शरदचंद्र चावरे, शेख ईग्रान, संतोष ब्रेलुर-ोड, रमेश सुर्यवंशी असे पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालीत असतांना हिंगोली गेट उडान पुलाचे खाली दोन व्यक्ती संशईतरित्या मोटरसायकल घेवुन थांबलेले मिळुन आले. त्यांची वर्तणुक संशयास्पद वाटत असल्याने त्यास त्याचे ताब्यातील मोटरसायकल बाबत विचारणा केली असता ते काहीएक समाधानकारक उत्तर देऊ शकत नव्हते. गुलाब राजु प्रधान, (वय २१) रा. बौध्द

**(पान ३ वर...)**

दै. सत्यप्रभा दि. 06/07/2022

# दहशत निर्माण करणारा खंजरसहीत अटक

**नांदेड दि.५-** खंजर बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या एकास शिवाजीनगर पोलिस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने खंजरसहीत अटक केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, गुन्हे शोध पथकातील अधिकारी व कर्मचारी हे पोलीस स्टेशन हददीत गुन्हेगार वॉच पेट्रोलीग करीत लालवाडी चौकाकडे गेले असतांना गोपनिय माहिती मिळाली की, श्रावस्तीनगर चौक येथील सार्वजनीक रोडवर एक इसम हातात चाकु घेवुन फिरवत असल्याने सदर ठिकाणी दहशत पसरली आहे. सदरील मांहिती तात्काळ पोलीस निरीक्षक डॉ.नितीन काशीकर यांना देवुन गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी हे तात्काळ श्रावस्तीनगर येथे जावुन पाहिले असता, सदर ठिकाणी एक इसम ज्याचे नांव विशाल निवृती नरवाडे वय २८ व्यवसाय मजुरी रा.सितामाय रावत कॉलनी श्रावस्तीनगर नांदेड हा आपले हातात एक लोखंडी खंजर घेवुन फिरवत असल्याचे दिसल्याने त्यास त्वरीत ताब्यात घेवुन धारदार खंजर व आरोपीसह पोलीस स्टेशनला हजर करून चांगली कामगीरी केली.



सदरील कामगीरी हि पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, उप विभागीय पोलीस अधिकारीचंद्रसेन देशमुख व पोलीस निरीक्षक नितीन काशीकर यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक, आर.व्ही वाहुळे, पोउपनि मिलीद सोनकांबळे, पो.हे.कॉ शेख इब्राहीम पोना बामणे, पोना दिलीप राठोड, पोशि सिंगल, पोशि शेख अझहर, पोशि दत्ता वडजे यांनी